# नि रो प

१९३२

पु. पां. गोखले.

# निरोप

## [ अभंग ]

हा मी जातो अमुच्या गांवा ।
देवा, राम राम घ्यावा ॥ १ ॥
असो द्याव्या ओळखदेखी ।
स्मृतीसंग्रहिं रेखोरेखीं ॥ २ ॥
पटतिल अंतःकरणीं खुणा ।
फुलता राहिल अपुलेपणा ॥ ३ ॥
मैला–कोसांच्या मग भीति ।
करतिल तोंडें कैशा रीति ॥ ४ ॥
राहुनि दूरहि अपुले हात ।
एक्या कार्यीं करतिल साथ ॥ ५ ॥
कर्तृत्वाचें दावुनि पाणी ।
कृतज्ञतेचीं लेवूं लेणीं ॥ ६ ॥
साधूं–होऊं मंगल एक ।
इतिहासाचा मंगल लेख ॥ ७ ॥
म्हणुनी जन हो आळवणी ।
अर्थ घ्या मज सांभाळुनी ॥ ८ ॥
हें तों अपुलें शीलच राया ।
वाटे कुरवंडावी काया ॥ ९ ॥
माय–भूमिसेवेसाठीं ।
आहें अपुल्या पाठोपाठी ॥ १० ॥

## ॥ श्रीराष्ट्रदेवोभव ॥

अनेक उत्तम आशीर्वाद विशेषः—

तरुण म्हटला म्हणजे तो ताज्या रक्ताचा पाहिजे, तरुण म्हटला म्हणजे तो कणखर हाडाचा पाहिजे. तरुण म्हटला म्हणजे तो मर्दानी मनाचा पाहिजे. तरुणाची तरतरी तीराला लाजविणारी हवी. तरुणाची विचारशक्ती समुद्रासारखी रत्नाकर हवी. तरुणाचें सिंहावलोकन इतिहासाला मुरड घालणारें हवें. तरुणानें पायाखालीं धरणी नमवावी. तरुणानें गगनाला हात घालावा. तरुणानें आपले डोळे भविष्याकडे लावावे. तरुणानें अरुणांला हुंगावे आणि तरुणानें आपले कान वरुणांकडे लावून ठेवावे. तरुणानें आपल्या पाठीवर भूतकाळाचा हात राखावा आणि पोटांत वर्तमानकाळचीं बोधफळें तरुणानें घालावीं. तरुणानें मरणाला मारावें, भीरुपणाला लाजावें, कीर्तीला भजावें, वीरपरंपरेला साजावें आणि तरुणाच्या दीपवल्या कर्तबगारीनें अक्कलमंदांनीं थिजावें ! असा असतो तोच तरुण चिरंजीव होतो, विजयी होतो. बाळ, तूंही असाच विजयीभव चिरंजीव तरुण हो आणि आपल्या माय-भूमीचें नांव राख. यापेक्षां आगगाडींतील प्रवासासारख्या या भुरट्या सहवासांतून भुर्कन् उडून जाण्याची वेळ आली असतां, दुसरा कोणता आशीर्वाद माझ्यासारखा पामर तुला देऊं शकेल ?"

**तरुणांचा नम्र हितचिंतक."**

जगाला जितकीं वर्षें लोटताहेत, तितकें नांवानांवानें शहाणपण पुढें चाललें आहे. अर्थात् आपले वाडवडील त्या मानानें पोर होते तर आपलीं पोरेंबाळें वडीलधारी होतील. असें होत राहणें हाच मुळीं जगण्याच्या शास्त्राचा पाया आहे. एरवीं; शिष्य सवाइ होण्यांत गुरूला आणि बेटा सवाई होण्यांत बापाला, कसा आनंद वाटला असता ? तो तसा जिथें वाटतो, तिथेंच जगण्याचें शास्त्र व्यवहारांत आहे. नाहीं तर 'असुनि जिवंतहि मेला' हाच मामला सुरू आहे, असें धडधडीत होतें. आपण, आपल्या कुलानें, समाजानें, राष्ट्रानें, जगानें मरावें, असें कोण्या जिवंत माणसाला वाटेल ? वाटणार नाहींच नाहीं. तर मग प्रत्येक मनुष्याला काय जबाबदारी येते, पहा. आपलीं मुलें-बाळें असोत किंवा आपल्या पावलावर पाऊल टाकून येणारीं दुसरीं कोणी असोत, तीं आपल्या-पेक्षां सवाई निघालीं पाहिजेत, अशी काळजी मनुष्यानें पावलापावलागणीक घेणें जरूर आहे माणुसकीचा हा पहिला धडा आहे. तो ज्यानें गिरवला, हातचा मळ केला आणि अशा रुबाबानें जगला, तोच माणूस म्हणून जगला.

निराशा ! छट् ! हवी कशाला ती ? निराशा म्हणजे

जितें मरण, जित्या मनाचा महारोग म्हणजे निराशा. नैतिक अध:पाताची पहिली ठिणगी म्हणजे निराशा. ईश्वरी स्फूर्तिचा आविर्भाव म्हणजे कला. होय ना? बस् तर मग. त्या ईश्वरी स्फूर्तिला मूठमाती देण्याची तयारी करणारा विषबिंदू म्हणजे निराशा. कलावंतांच्या मालिकत एका टोकाला चित्रकार तर दुसऱ्या टोकाला शिल्पकार असतो. आणि या दोघांचा मध्य व किरण साधून झुबक्यासारखा कवि नांदत असतो. म्हणूनच एकाच्या वेडानें व दुसऱ्याच्या शहाणपणानें त्याला आपल्या शब्द-सृष्टीचा शृंगार थाटतां येतो. हा कविच सांगतो कीं—
"काय निराशा असे बरें? बुजग बाहुलें जगांतलें. मूर्ख भिउनियां त्या गेले!" मला वाटत नाहीं कीं स्वतांला माणूस म्हणवून घेणारा ही अति शहाण्यांची पंगत साजरी करूं इच्छील! आणि हें जर खरें, तर कोणीही भेटी-बरोबर निराशेला सांगेल कीं "जाई परतोनी."

---

१ हांसत कर्म करावें, भोगावें हंसत तेंचि परिणामीं
कौशल्य हें जयाचें, त्याच जनाची जगीं परी नामीं
२ रखडत कर्म करावें भोगावें रडत तेंचि परिणामीं
हेंच कपाळ जयाचें, काय तयाची जनीं परी नामीं
३ हांसत कर्म करावें, भोगावें रडत तेंचि परिणामीं
त्यातें जो बोलतसे अन्य मरो, लव झिजे न परि नामीं
४ रखडत कर्म करावें, भोगावें हंसत तेंच परिणामीं
प्राक्तन हेंच तयाचें शिस्त न ज्याच्या करीं परी नामीं

---

डोक्यांच्या केसांची कुरळ संसारांतील चंचल मनाला भुरळ पाडणारी; कपाळाची भव्यता भोंवतालच्या बागड-णारांत भावभक्ति उत्पन्न करणारी; भुवयांची कमान परि-स्थितीला काबूंत ठेवणारी, टांचणीटोंच जमीन लक्षांत राहील इतकी बारीक नजर, मुंग्यांची कुजबुज समजेल इतके टवकारलेले कान; एकंदर चेहऱ्याचा मोहरा फुलांनीं तारे होण्यासारखा; नाकांतला श्वास लोकांना ध्यास लावील—ओठांवरील हास्य लोकांची खुलावट करील—जिभेवरील शब्द लोकांच्या गळीं उतरेल—विशाल छातीचा, पिळदार दंडांचा, गोल मनगटाचा, मजबूत कमरेचा, घटावलेल्या मांडीचा, टेसदार पावलांचा आणि एकंदर

अवयवांच्या रेखीव आंखीवपणानें देवांनीं हेवा करावा असा–असा पुरुषोत्तम ज्या वेळीं आपल्या कर्तबगारीच्या शेषावर विसावतो तेव्हां निसर्गलक्ष्मी त्याचे पाय चुरत असते. हो, बाळ असा पुरुषोत्तम हो.

---

ना रत्नें परि एकजात नृमणी राष्ट्रास उंचावती ।
देतीं आणिक वाढतें बल जया देवेंहि लाचावती ।।
न्यायाची धरुनीच कास मरती न्यायें सदा वीर जे ।
अन्यें ताणिति झोंप तैं उभविती कार्यें स्वरक्तध्वजें ।।१।।

अन्यें काढिति पाय जेथुनि तिथें रोवोनिया ठास जे ।
त्यांच्या हातुनि नित्य राष्ट्ररचना होवोनि तेजें सजे ।।
हाडातें निज अंथरोनि रचिती पाया अहीमस्तकीं ।
ताऱ्यांनीं शिखराप्रती मढविती, स्तंभा स्वयंस्वस्तिकीं ।।२।।



प्रकाशकः—
सौ० सुलोचनाबाई गोखले,
मु॥. कराड, जि. सातारा.

मुद्रक—
ग. म. नलावडे,
नारायण छापखाना,
१६ बुधवार पुणें.